# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

## प्राचार्यांचे अभिभाषण

## आणि

## बी.एड. प्रथम वर्ष स्वागत समारंभ

## अहवाल

शासकीय अध्यापक महाविद्यालय पनवेल येथे शुक्रवार दिनांक ०७ नोव्हेंबर २०२५ रोजी महाविद्यालयाच्या सरस्वती कक्षामध्ये **“प्राचार्यांचे अभिभाषण आणि बी.एड. प्रथम वर्ष स्वागत समारंभ”** अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्षातर्फे आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या माननीय प्राचार्य डॉ. रमा भोसले या होत्या. कार्यक्रमाचे मार्गदर्शन व आयोजन प्राध्यापिका डॉ. प्रियांका सुभेदार यांनी केले.

दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. कार्यक्रमाच्या स्वागत सोहळ्यामध्ये द्वितीय वर्ष छात्राध्यापकांनी स्वागतगीताच्या स्वरांचे रंग मिसळले. कार्यक्रमाचे आयोजक मा. प्रा.डॉ. प्रियांका सुभेदार यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करत कार्यक्रमाची उद्दिष्टे स्पष्ट केली. द्वितीय वर्ष छात्राध्यापक श्री. रोहन भोईर आणि श्रीमती. तनुश्री आठवले यांनी महाविद्यालयाची तोंड ओळख करून देत आपले अनुभव सर्वांपुढे मांडले. महाविद्यालयाच्या मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले यांनी महाविद्यालयाची परिपूर्णरित्या अंतर्बाह्य ओळख करून दिली. तसेच त्यांनी महाविद्यालयात होणाऱ्या उपक्रमांची व आदर्श शिक्षक बनण्यासाठी स्वीकारल्या जाणाऱ्या जबाबदाऱ्यांची प्रथम वर्ष छात्राध्यापकांना जाणीव करून दिली. "शिक्षक हा एक नवी पिढी घडवत असतो आणि विद्यार्थ्यांना समाजामध्ये सुजाण नागरिक बनण्यास प्रवृत्त करतो."असे उद्गार काढत मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले यांनी आपल्या अभिभाषणातून प्रथम वर्ष छात्राध्यापकांना शिक्षकाचे अनन्यसाधारण महत्त्व पटवून दिले.

सर्व प्राध्यापकवृंदांनी आपला परिचय करून देत प्रथम वर्ष छात्राध्यापकांना शुभेच्छा दिल्या आणि बी. एड. च्या शैक्षणिक पर्वात पदार्पण केल्याबद्दल स्वागत केले. प्रथम व द्वितीय वर्ष छात्राध्यापकांनी एकमेकांशी परिचय करून घेतला. या संवादातून द्वितीय वर्ष छात्राध्यापकांनी प्रथम वर्ष छात्राध्यापकांच्या मनावर आत्मविश्वास, चिकाटी व धैर्य अशा अनेक गुणांची प्रभावीपणे छाप उमटवली. प्रथम वर्ष छात्राध्यापकांमध्ये असणाऱ्या क्षमता , त्यांच्यातील सुप्त गुण याची माहिती त्यांच्या मुलाखती द्वारे सर्व प्राध्यापकांनी घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन द्वितीय वर्ष छात्राध्यापक श्रीमती. स्मितल कुरूप व आभारप्रकटीकरण श्रीमती. अक्सा खान यांनी केले. या स्वागत समारंभाचे आयोजन द्वितीय वर्ष छात्राध्यापकांनी केले.



**कार्यक्रमाचे मार्गदर्शक मा. प्रा. डॉ. प्रियांका सुभेदार कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना**



**महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले अभिभाषण करताना**




द्वितीय वर्ष छात्राध्यापक स्वागतगीत सादर करताना





द्वितीय वर्ष छात्राध्यापक श्री. रोहन भोईर आणि श्रीमती. तनुश्री आठवले महाविद्यालयाची ओळख करून देताना



द्वितीय वर्ष छात्राध्यापक श्रीमती. अक्सा खान आभारप्रकटीकरण करताना



प्रथम व द्वितीय वर्ष छात्राध्यापक संवाद साधताना




द्वितीय वर्ष छात्राध्यापक श्रीमती. स्मितल कुरूप सूत्रसंचालन करताना







प्रथम वर्ष छात्राध्यापकांच्या मुलाखती घेताना प्राध्यापक वृंद



# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

## बी. एड. वर्ष २०२५-२०२७

## प्राचार्यांचे अभिभाषण

## आणि

## बी. एड. प्रथम वर्ष स्वागत समारंभ



# सुस्वागतम



महाविद्यालयात सर्व बी. एड. छात्राध्यापकांना कळविण्यात येते की २०२५-२०२७ या वर्षामधील बी. एड. प्रथम वर्ष छात्राध्यापकांचा स्वागत समारंभ,आणि मा. प्राचार्यांचे अभिभाषणाचा कार्यक्रम शुक्रवार दिनांक ७ नोव्हेंबर २०२५रोजी आयोजित करण्यात आला आहे तरी या कार्यक्रमासाठी बी. एड प्रथम व द्वितीय वर्ष छात्रध्यापकांनी उपस्थित राहावे.

**मार्गदर्शक**
मा. प्रा.डॉ.प्रियांका सुभेदार

**अध्यक्ष**
मा.प्राचार्य. डॉ . रमा भोसले

**प्रमुख उपस्थिती**
प्रा. बिजली दडपे
प्रा. डॉ. उज्वला डोणे, प्रा. डॉ. नीलिमा मोरे.

**आयोजक**
द्वितीय वर्ष छात्रअध्यापक

स्थळ :- सरस्वती कक्ष

वेळ :- ११.००

# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

## कार्यक्रम पत्रिका

### बी. एड. वर्ष २०२५-२०२७

### प्राचार्यांचे अभिभाषण
### आणि
### बी. एड. प्रथम वर्ष स्वागत समारंभ



# सुस्वागतम



| | |
|---|---|
| दीपप्रज्वलन | मा.प्राचार्य. आणि सर्व प्राध्यापक यांच्या हस्ते |
| स्वागतगीत | द्वितीय वर्ष छात्राध्यापक |
| मा.प्राचार्य.डॉ. रमा भोसले यांचे स्वागत | मा.प्रा. डॉ. प्रियांका सुभेदार |
| प्राध्यापकांचे स्वागत | द्वितीय वर्ष छात्राध्यापक |
| प्रास्ताविक | मा.प्रा.डॉ. प्रियांका शुभेदार |
| प्राचार्यांचे अभिभाषण | मा. प्राचार्य . डॉ. रमा भोसले |
| प्रथम वर्ष छात्राध्यापकांचे प्रातिनिधीक स्वागत | द्वितीय वर्ष छात्राध्यापक |
| आभार | श्रीमती. अक्सा खान |
| बी. एड. प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष छात्राध्यापकांचा परस्पर परिचय | प्रथम व द्वितीय वर्ष छात्राध्यापक |
| सूत्रसंचालन | श्रीमती.स्मितल कुरूप |